**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**गुरूवार, दिनांक : २३ मे, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **बुद्ध पौर्णिमेचा सण सर्वत्र उत्साहात साजरा, नागपूरच्या दीक्षाभूमीवर तीन दिवसीय बुद्ध महोत्सवाला सुरुवात.**
2. **ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या 'बफर झोन'मध्ये आज बुद्ध पौर्णिमेला ८९ मचाणांवरून प्राणी गणना केली जाणार.**
3. **नागपूर महानगरपालिकेतर्फे आतापर्यंत एकूण 60 टक्के नद्यांची स्वच्छता झाली, उर्वरित कामे 15 जुन पर्यंत करण्याचे मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांचे निर्देश.**
4. **४४ अंश तापमानासह अकोला सलग दुसऱ्या दिवशी विदर्भात सर्वात उष्ण, आज आणि उद्या विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान राहणार.**

######

**बुद्ध पौर्णिमा**

बुद्ध पौर्णिमा आज साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड,पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यपाल रमेश बैस यांनी यानिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान बुद्धांची अहिंसा, शांती आणि करुणेची शिकवण पूर्वीइतकीच आजही प्रासंगिक असल्याचं, राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भगवान गौतम बुद्ध जयंतीच्या निमित्ताने डॉ.आंबेडकर स्मारक समिती च्यावतीने दीक्षाभूमी वरील तथागत बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यांना पुष्पमाला अर्पण करण्यात आली. त्यानंतर दीक्षाभूमीवरील पवित्र स्तुपात डॉ.आंबेडकर यांच्या अस्थीला पुष्प अर्पण करून बुद्ध वंदना घेण्यात आली. याप्रसंगी डॉ. आंबेडकर स्मारक समितीचे सचिव डॉ.राजेंद्र गवई, डॉ.चंद्रशेखर मेश्राम, डॉ.कमलताई गवई, विलास गजघाटे, डॉ.प्रदीप आगलावे, भन्ते नागदीपाँकर, डॉ.डी.जी.दाभाडे हे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.राजेंद्र गवई

म्हणाले की, बुध्दाचा विचार हा कालातीत आहे. आज सुद्धा बुध्द यांच्या विचारांची जगाला आवश्यकता आहे.

दरम्यान नागपूर इथं बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट सेमिनरीहिल्स उंटखाना यांच्या संयुक्त विद्यमानं दीक्षाभूमीवर आयोजित तीन दिवसीय बुद्ध महोत्सवाला आजपासून सुरुवात झाली आहे. यात शंभर बालकांना श्रामणेर दीक्षा देण्यात येणार आहे, अशी माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी दिली.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बुध्दीस्ट स्टडीज सेंटरमध्ये भगवान गौतम बुध्द जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कुलसचिव मंगेश वरखेडे यांनी भगवान गौतम बुध्द आणि कर्मयोगी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पार्पण केले. यावेळी उपस्थितांनी बुध्द वंदना म्हटली.

याशिवाय नागपुरात बुद्ध पौर्णिमे निमित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं.

**बुलढाणा** जिल्ह्यात बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली. जिल्ह्यातल तथागत विहार गारडगाव येथे सकाळी ८ वा धम्मवंदना पार पडली. यावेळी विश्वभूषण महामानव भारतरत्न डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांना बौद्ध अनुयायांनी आदरांजली वाहिली.

गडचिरोलीत आज विविध सामाजिक संघटनांच्या वतीने बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. संध्याकाळी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने गडचिरोलीत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे.

यवतमाळच्या राळेगाव तालुक्यातील जागजई इथं बुद्धपोर्णिमा निमित्त गोंडवाना समाजातील "'देव आंघोळ"'आणि देवदर्शन करण्यासाठी आदिवासी समाज बांधवांची जत्रा फुलली आहे. या ठिकाणाला आदिवासींची पंढरी म्हणून ओळखल्या जात असून, इथं शेकडो वर्षांपूर्वीपासून आंघोळीची ही परंपरा आहे, वर्धा नदी पात्रात ही देव आंघोळ घातली जाते. याठिकाणी काळाचौरव, पांढराचौरव, राव, माणकोबाई ह्या देवांना भक्तगण आंघोळीसाठी आणतात. वाजतगाजत हजारो आदिवासी समुदाय इथं आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवितात.

**प्राणी गणना**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या ‘बफर झोन’ मध्ये, आज बुद्ध पौर्णिमेला, चंद्राच्या लख्ख प्रकाशात, ८९ मचाणांवरून प्राणी गणना केली जाणार आहे. ‘निसर्ग अनुभव’ या नावानं दरवर्षी हा उपक्रम राबवला जातो. एका मचाणवर दोन निसर्गप्रेमींना साडेचार हजार रुपये

शुल्क आकारून, रात्रभर मुक्कामाची संधी दिली जाते. निसर्ग अनुभवासाठी निसर्गप्रेमींकडून, या सर्व मचाणांची नोंदणी पूर्ण झालेली आहे.
यावर्षी प्रथमच 'कोअर झोन' वगळता, 'बफर' क्षेत्रातील, चंद्रपूर, मूल, मोहर्ली, खडसंगी, पळसगाव आणि शिवणी या सहा, परिक्षेत्रातील मचाणांवर, प्राणीगणना अर्थात निसर्ग अनुभव हा उपक्रम राबवण्यात येत आहे.
दरम्यान राज्यातील इतर वनवृत्तातही अशाच प्रकारचे आयोजन करण्यात आले आहे.

**डोंबिवली एमआयडीसी स्फोट**

डोंबिवली एमआयडीसीतील अमुदान केमिकल कंपनीत बॉयलरचा स्फोट झाल्याची घटना दु:खद असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावरून सांगितले आहे. ८ जण या घटनेत अडकले होते. त्यांना बाहेर काढण्यात आले आहे. जखमींच्या उपचाराची व्यवस्था करण्यात आली असून आणखी रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांशी आपली चर्चा झाली आहे. एनडीआरएफ, टीडीआरएफ, अग्नीशमन दलाच्या चमू पाचारण करण्यात आल्या आहेत. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी आपण ईश्वरचरणी प्रार्थना करतो, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी समाजमाध्यमावर म्हटले आहे. दरम्यान या दुर्घटनेत आतापर्यंत सहा कामगारांचा मृत्यू झाला असून पाच महिलांसह 38 कामगार जखमी झाल्याची माहिती आहे.

**नदी-नाले सफाई**

पावसाळ्यापूर्वी शहरातील नदी आणि नाले सफाईचे काम पूर्ण व्हावं यादृष्टीनं या कार्याला गती देण्यात आली आहे. नागपूर शहरातील नाग, पिवळी आणि पोहरा या तिनही प्रमुख नद्यांची, आतापर्यंत एकूण साठ टक्के स्वच्छता झाली आहे. उर्वरित कामे १५ जुनपर्यंत करण्याचे नियोजन, मनपा तर्फे करण्यात आलं आहे.
पावसाळ्यामध्ये कोणत्याही प्रकारे नदीच्या प्रवाहाला अडथळा होऊ नये आणि सुरळीतरित्या पाणी वाहून जावे यादृष्टीनं निर्धारित वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी दिले आहेत.

नागपूर शहरातून वाहणाऱ्या नागनदी, पिवळी नदी आणि पोहरा नदी या तिनही नद्यांच्या स्वच्छतेचे कार्य प्रगतीपथावर आहे.

नागपूर शहरात एकूण २२७ नाले असून, यापैकी १५३ नाल्यांची सफाई मनुष्यबळाद्वारे तर, ७४ नाल्यांची सफाई मशीनद्वारे केली जाते. आतापर्यंत १७० पेक्षा जास्त नाल्यांची सफाई

पूर्ण झालेली असून, उर्वरित नाल्यांची सफाई लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी दिलेत.

**अप ात**

नागपूर कडून बालाघाटकडे तांदूळ भरून जात असलेल्या ट्रकला, बालाघाट वरून भंडारा कडे विरुद्ध दिशेनं येत असलेल्या, पीकअप वाहनानं समोरा समोर धडक दिल्याची दुर्घटना, आज भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्यातील, बिनाकी इथ घडली. यात ट्रक चालक गंभीररित्या जखमी झाला आहे.

**कोषागार**

निवृत्ती वेतनधारकांना, कोषागारा मार्फत निवृत्ती विषयक लाभ प्रदान करताना, प्रदानाबाबत किंवा वसुलीबाबत दूरध्वनीद्वारे संपर्क साधला जात नाही आणि ऑनलाईन व्यवहारा विषयी सूचित करण्यात येत नसून, असे दूरध्वनी संदेश घेवू नये असं आवाहन, नागपूर जिल्ह्याचे अप्पर कोषागार अधिकारी, सतीश गोसावी यांनी केलं आहे.

जिल्हा कोषागाराच्या अधिनस्त, सर्व निवृत्ती वेतनधारक, कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना, कोषागारा मार्फत निवृत्तीवेतन, सुधारित निवृत्तीवेतन, कुटुंब निवृत्तीवेतन तसंच, निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान, वसुलीबाबत किंवा प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत दूरध्वनीद्वारे संपर्क साधला जात नाही किंवा ऑनलाईन व्यवहार करण्याविषयी सूचित केलं जात नाही.

कोषागार कार्यालयामार्फत फक्त लेखी स्वरुपात, पत्रव्यवहार केला जातो, असं प्रसिद्धी पत्रात सांगण्यात आलं आहे.

**डॉ. रवींद्र शोभणे**

साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च समजला जाणारा महाराष्ट्र शासनाचा ‘विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार’, ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, डॉ.रवींद्र शोभणे यांना प्राप्त झाला आहे .त्यानिमित्त येत्या रविवारी, २६ मे रोजी विविध संस्थांच्या वतीनं त्यांच्या सत्कार केला जाणार आहे. झांशी राणी चौकातील विदर्भ साहित्य संघाच्या, चौथ्या मजल्यावरील अमेय दालनात, सायंकाळी सहा वाजता होणा-या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, वि.सा.संघाचे अध्यक्ष, प्रदीप दाते राहणार आहेत.

सक्षम समिक्षा ’या त्रैमासिकानं काढलेल्या डॉ.रवींद्र शोभणे साहित्य विशेषांकाचे प्रकाशन, यावेळी मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येनं उपस्थित

राहावे असं आवाहन, विदर्भ साहित्य संघ, विदर्भ गौरव प्रतिष्ठान, डॉ .गिरीश गांधी फाऊंडेशन, वनराई फाऊंडेशन, शब्दाली प्रकाशन यांनी केलं आहे.

**घाटकोपर दुर्घटना**

मुंबईत घाटकोपर इथं महाकाय फलक कोसळून घडलेल्या दुर्घटने नंतर, नवी मुंबई महापालिका आयुक्त, डॉ.कैलास शिंदे यांनी, परवाना विभाग तसंच अतिक्रमण विभागाला सतर्क होऊन, अनधिकृत होर्डींग विरोधी कारवाईचे निर्देश दिले होते.

त्यानुसार, संबंधित विभागानं, अनधिकृत होर्डिंग विरोधात, धडक कारवाई करत, आतापर्यंत मुंबईतल्या ३४ होर्डींग्जवर, निष्कासनाची कारवाई केली आहे.

**ओबीसी प्रमाणपत्र**

पश्चिम बंगाल सरकारनं, २०१० नंतर जारी केलेली इतर मागासवर्ग-ओबीसीची सर्व प्रमाणपत्र कोलकाता उच्च न्यायालयानं रद्दबातल ठरवली आहेत. ओबीसी प्रमाण-पत्र जारी करण्याच्या प्रक्रियेला, आव्हान देणाऱ्या जनहित याचिकेवरील सुनावणी दरम्यान कोलकाता उच्च न्यायालयाच्या खंडपीठानं, २०१० नंतर तयार करण्यात आलेल्या ओबीसी सूचीला बेकायदेशीर ठरवलं.

न्यायालनं पश्चिम बंगाल मागासवर्ग आयोगाला, पश्चिम बंगाल मागासवर्ग आयोग अधिनियम १९९३ च्या आधारे, ओबीसीची नवीन यादी तयार करण्याचे निर्देशही दिले आहेत.

**हवामान**

येत्या दोन दिवसात राज्यातल्या सर्व विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, विदर्भात उष्णतेची लाट कायम असून विदर्भात गेलाय २४ तासात अकोला इथं ४४ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं. त्याखालोखाल अमरावती आणि ब्रह्मपुरी इथं ४३ अंशाच्या घरात तापमान होता तर भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि ब्रह्मपुरी इथं तापमान ४२ अंशाच्या वरती आहे, नागपुरात आज ४१ पूर्णांक दोन अंश सेल्सियस तापमान असून वाशीम आणि गोंदिया इथं तापमान ४० अंशाच्या आसपास आहे.

दरम्यान वर्धा, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ, वाशीम, अकोला आणि बुलढाणा इथं आज पावसाचा येल्लो अलर्ट तर उद्या बुलढाणा वगळता संपूर्ण विदर्भात, पावसासह वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट आहे.

#####